# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक ०५ नोव्हेंबर २०१४

## संशोधनाच्या क्षेत्रात होणार आमुलाग्र बदल

## मुंबई विद्यापीठाने घेतला पुढाकार

## वाङ:मय चौर्याला बसणार आळा

## वाङ:मय चौर्याला प्रतिबंध करणारी संगणक प्रणाली

मुंबई - संशोधनाच्या क्षेत्रात महत्वाचे पाऊल टाकत मुंबई विद्यापीठ एक अभिनव प्रयोग हाती घेत आहे.संशोधनाच्या क्षेत्रातील ज्ञानाचे भंडार आणि नव नविन प्रकल्प सर्वांना खुले व्हावे तसेच वाङ्मयचौर्यावर र्निबध लावण्यासाठी मुंबई विद्यापीठ पुढाकार घेत आहे.यासाठी  एक विशेष सॉफ्टवेअर  खरेदी करण्यात येणार आहे.या सॉफ्टवेअरच्या मदतीने त्या प्रंबंधाची छाननी करण्यात येणार आहे.आज झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

भारतीय संशोधन क्षेत्रात वाङ्मयचौर्य ही अतिशय गंभीर समस्या असल्याचे दिसून येत आहे.त्यासोबतच संशोधनासाठी संशोधन साहित्य आणि संदर्भही स्वत:च्या नावावर खपविण्याच्या प्रवृत्तीमुळे संशोधनाचा दर्जा खालावतो. याचा विचार करून विद्मापीठ अनुदान आयोगाच्या शोधगंगा या प्रकल्पांतर्गत संकेतस्थळावर अपलोड केले जाणारे प्रबंध एका विशेष सॉफ्टवेअरमध्ये छाननी केले जाणार आहेत. प्रबंधातील भाग कॉपी केलेला असल्यास त्याची तात्काळ माहिती संबंधित तज्ज्ञांना कळते. कॉपीराइट कायद्याचा भंग केला असल्यास तशी नोंद केली जाते.  संशोधक विद्यार्थ्यांने आपल्या प्रबंधाची सी.डी. विद्यापीठात सादर केल्यानंतर त्याचा प्रबंध या सॉफ्टवेअरमध्ये छाननी केला जातो. सॉफ्टवेअरने हिरवा कंदील दिल्यानंतरच त्याचा प्रबंध स्वीकृत केला जाईल. त्यामुळे भविष्यात कॉपी-पेस्ट करून पीएच.डी. मिळविली असल्यास ते तात्काळ निदर्शनास येईल.

यू.जी.सी.च्या शोधगंगा आणि शोधगंगोत्री या नव्या प्रकल्पांमुळे संशोधकांसाठी माहितीचे खूप महत्त्वाचे संदर्भस्रोत खुले झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने सेट-नेटसाठी पीएच.डी.चा पर्याय दिल्यानंतर संशोधनाकडे वळणाऱ्यांची संख्या खूप वाढली. मात्र, पीएच.डी.साठी नोंदणी करताना संशोधन आराखडा कसा असावा, प्रबंध कसा लिहावा, इतरांचे प्रबंध कोठे पाहावेत इत्यादी अनेक प्रश्नांबाबत संशोधक विद्यार्थ्यांना समस्या जाणवतात. यू.जी.सी.च्या शोधगंगा व शोधगंगोत्री या नव्या प्रकल्पांनी ही समस्या सोडवली आहे. भारतातील विविध विद्यापीठांमध्ये एम.फिल व पीएच.डी. साठी पदवीसाठी केल्या जाणाऱ्या संशोधनाचे लघुप्रबंध व प्रबंध शोधगंगा प्रकल्पांतर्गत www.shodhganga.Inflibnet.ac.in  या संकेतस्थळावर उपलब्ध केले जात आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने २००९ मध्ये एम.फिल व पीएच.डी.साठी नवीन नियमावली लागू केली. त्यानुसार भारतातील सर्व विद्यापीठांना त्यांच्या संशोधकांचे अंतिम संशोधन अहवाल या ठिकाणी अपलोड करावे लागणार आहेत. हे अहवाल पाहणे किंवा डाऊनलोड करणे इत्यादी सुविधा सर्वासाठी खुल्या आहेत.

शोधगंगाची उद्दिष्टे :

१) आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधकांना भारतीय प्रबंध उपलब्ध करून देणे.

२) भारतातील प्रत्येक विद्यापीठाने इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रबंध संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे.

३)  जुन्या प्रबंधांच्या डिजिटलायझेशनसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे.

प्रबंध अपलोड करण्याची प्रक्रिया : Inflibnet च्या या क्रांतिकारी संकेतस्थळामुळे केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील सर्वच संशोधक या संकेतस्थळावर उपलब्ध संशोधनाचा विनामूल्य लाभ घेऊ शकतात. आतापर्यंत जवळपास ४३०० प्रबंध शोधगंगा मध्ये उपलब्ध आहेत. भारतातील कोणत्याही विद्यापीठामधील एम.फिल अथवा पीएच.डी. झालेल्या विद्यार्थ्यांस, त्यांच्या संशोधन मार्गदर्शकास त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या अधिकृत व्यक्तीस त्यांचे प्रबंध संकेतस्थळावर सादर करता येतात.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)